**प्रेस नोट दि.१०/०९/२०१८**

## "घरफोडीतील रेकॉर्डवरील गुन्हेगारास जेरबंद केले बाबत.."

## तपास पथकातील पो.उप.निरी.महेंद्र पाटील, पो.हवा.बापुसाहेब खुटवड, योगेश जगताप पो.ना.विनायक शिंदे, दिनेश भांदुर्गे, अमोल सरडे, विशाल चौगुले, विकास बो-हाडे, शंकर कुंभार, महाविर वल्टे, हर्षल शिंदे, अमेय रसाळ यांची उत्कृष्ट कामगिरी

## फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर

---

फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री.एम.डी.पाटील यांना त्यांचे बातमीदाराकडुन मिळाली की, सध्या चतुःशृगी पोलीस स्टेशनकडुन कारवाई होवुन येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे रवाना केलेला रेकॉर्डवरील गुन्हेगार जयवंत उर्फ जयडया उर्फ जेडी गोवर्धन गायकवाड,सध्या रा.डी.पी.रोड आंबेडकर वसाहत,सुरज प्रोव्हिजन स्टोअर्स जवळ,औंध,पुणे व मुळ रा.मु.पो. सुर्डी,ता.बार्शी,जि.सोलापुर याने फरासखाना पोलीस स्टेशन हद्दित काही घरफोडी चो-या केलेल्या आहेत.

प्राप्त बातमीची शहानिशा करणेकामी मा.वरिष्ठांचे आदेशाने मा.न्यायालयाकडुन प्रोडक्शंन वॉरंट घेवुन त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथुन ताब्यात घेवुन फरासखाना पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचेकडे प्राप्त बातमीचे अनुषंगाने कसुन चौकशी करता त्याने खालील प्रमाणे घर फोडी चोरीचे दाखल गुन्हे केल्याची कबुली दिली आहे.

१) फ.खाना पो.स्टे.गु.रजि.नं.१२५/२०१८ भा.द.वि.क.४५४,४५७,३८०,५११
२) फ.खाना पो.स्टे.गु.रजि.नं.७३/२०१८ भा.द.वि.क.४५४,४५७,३८०
३) फ.खाना पो.स्टे.गु.रजि.नं.१२९/२०१८ भा.द.वि.क.४५४,४५७,३८०
४) फ.खाना पो.स्टे.गु.रजि.नं.१०२/२०१८ भा.द.वि.क.३८०

वर नमुद गुन्हे त्याचेकडुन उघडकीस आणुन त्याचेकडुन तपासादरम्याने दाखल गुन्हयातील चोरलेल्या मालापैकी रोख रक्कम, सोने-चांदीचे दागीने,मोबाईल हॅण्डसेट व लोखंडी कटावणीसह असा एकुण ८७,६०० रू किचा ऐवजासह वेळोवेळी हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही पो.उप.निरी.महेंद्र पाटील, पो.हवा.बापुसाहेब खुटवड, योगेश जगताप पो.ना. विनायक शिंदे, दिनेश भांदुर्गे, अमोल सरडे, विशाल चौगुले, विकास बो-हाडे, शंकर कुंभार, महाविर वल्टे, हर्षल शिंदे, अमेय रसाळ यांनी केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**